आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
३ जुलै २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या सोमवारपासून ६ दिवसांच्या परदेश दौऱ्यावर, इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडला देणार भेट

- पाकिस्तान दहशतवादी कारवायांना पाठिंबा देणं थांबवत नाही तोपर्यंत सिंधु पाणी वाटप करार स्थगित राहील या भूमिकेवर भारत ठाम

- महाराष्ट्रात भेसळयुक्त दूध विक्री करणाऱ्यांना १० लाख रुपये दंड करण्याचा राज्य सरकारचा इशारा

**आणि**

- राज्यात अनेक ठिकाणी जोरदार पावसामुळे जनजीवन प्रभावित, कोकण आणि लगतच्या घाट परिसरात येत्या ४ दिवसात वादळीवाऱ्यासह, मुसळधार पावसाचा हवामान विभागाचा इशारा

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या सोमवारपासून ६ दिवसांच्या परदेश दौऱ्यावर जाणार असून ते इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडला भेट देणार आहेत. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे पूर्वेकडच्या देशांसाठीचे सचिव रुद्रेंद्र टंडन यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. ६ ते ८ जुलै दरम्यान प्रधानमंत्री इंडोनेशियात जाणार असून ते जकार्ताला भेट देतील. इंडोनेशियाचे अध्यक्ष प्रबोवो यांच्याशी ते द्विपक्षीय चर्चा करतील. त्यानंतर प्रधानमंत्री योग्यकर्ता या ऐतिहासिक वारसा शहरात प्रंबानन मंदिर संकुलाला भेट देतील. तिथं भारताच्या सहकार्यानं वारसा संरक्षण आणि संवर्धनाचं काम सुरु होणार आहे.

दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात ८ ते १० जुलै या काळात मोदी ऑस्ट्रेलियात जाणार असून तिथं ते भारत ऑस्ट्रेलिया वार्षिक परिषदेत सहभागी होतील.

तिसऱ्या टप्प्यात प्रधानमंत्री १० आणि ११ जुलैला न्यूझीलंडमधे जाणार आहेत. न्यूझीलंडचे प्रधानमंत्री क्रिस्तोफर लक्झॉन यांच्याशी ते विविध मुद्द्यांवर चर्चा करतील. गेल्या ४० वर्षात भारतीय प्रधानमंत्र्यांचा हा पहिलाच न्यूझीलंड दौरा आहे.

<><><><><>

पाकिस्तान दहशतवादी कारवायांना पाठिंबा देणं थांबवत नाही तोपर्यंत सिंधु पाणी वाटप करार स्थगित राहील ही भारताची स्पष्ट भूमिका असल्याचं परराष्ट्रव्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी आज नवी दिल्ली इथं वार्ताहर परिषदेत सांगितलं. पाकिस्ताननं सीमापार दहशतवादाला खतपाणी घालणं कायमचं थांबवलं पाहिजे, असं ते म्हणाले.

तिस्ता पाणीवाटपाविषयी भारताचा दृष्टिकोन यापूर्वीच बांगलादेशला कळवला असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

महाराष्ट्रात, भेसळयुक्त दूध विक्री करणाऱ्यांना १० लाख रुपयांपर्यंत दंड करण्याचा इशारा अन्न आणि औषध प्रशासनानं दिला आहे. दूध निर्मितीपासून वितरणापर्यंतच्या टप्प्यात कुठेही भेसळ झाली तर ही कारवाई केली जाईल, असं अन्न आणि औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे म्हणाले. दुग्ध व्यवसायात असलेल्यांसाठी त्यांनी नवीन दिशानिर्देश आज जारी केले. त्याचं काटेकोर पालन करण्याचं आवाहन त्यांनी सर्वांना केलं.

काही हॉटेल आणि रेस्टॉरंट चालकांनी कीड नियंत्रणाची खोटी प्रमाणपत्र सादर केल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यांचा परवाना रद्द करण्याचा इशारा त्यांनी दिला.

<><><><><>

विविध विद्युत कायद्यांनुसार राज्यात पोस्टपेड स्मार्ट मीटर बंधनकारक असल्याचं ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर साकोरे यांनी आज विधानसभेत सांगितलं. स्मार्ट मीटरमुळे वीज बिल वाढतं हा गैरसमज असल्याचं त्या म्हणाल्या. राज्यात आतापर्यंत सुमारे सव्वा कोटी स्मार्ट मीटर लावले आहे. त्यापैकी सुमारे ४ लाख ग्राहकांकडून वीज बिल वाढीच्या तक्रारी आल्या असल्याचं त्यांनी सांगितलं.

मुंबईतल्या हाफकिन संस्थेचं कुठल्याही प्रकारे खासगीकरण करणार नसल्याचं सरकारनं आज विधानसभेत स्पष्ट केलं. कारभार सुधारण्यासाठी या संस्थेची जबाबदारी सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांच्याकडे देऊ अशी घोषणा अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी केली.

**<><><><><>**

युवा व्यवहार मंत्रालयानं आज नवी दिल्लीत माय भारत उद्योग संघटना परिषद आयोजित केली आहे. असोचॅम, फिक्की, सीएआयटी आणि सीआयआय यासारख्या उद्योग संघटना या परिषदेत सहभागी झाल्या आहेत.

उद्योग क्षेत्र आणि 'माय भारत' यांच्यातल्या सहकार्यामुळे युवकांची ऊर्जा राष्ट्रीय विकास उद्दिष्टांकडे प्रभावीपणे वळवता येईल, असं केंद्रीय युवा कार्य आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांनी या कार्यक्रमात बोलताना सांगितलं.

विविध उद्योग आणि उद्योग संघटना सध्या युवक क्षेत्रात कोणत्या प्रकारे कार्यरत आहेत, याचा आढावा या बैठकीत घेतला जाणार आहे, असं युवा कार्य आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितलं. या परिषदेच्या उद्दिष्टांबद्दल बोलताना त्या म्हणाल्या…

**—- होल्ड—- बाईट—- रक्षा खडसे - -**

**<><><><><>**

महाराष्ट्रात आज अनेक ठिकाणी जोरदार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं.

**रायगड** जिल्ह्यात सतत कोसळणाऱ्या पावसामुळे अंबा नदीनं धोक्याची पातळी ओलांडली आहे तर डोलवहाळ इथं कुंडलिका नदीनं इशारा पातळी ओलांडल्यामुळे नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. पावसाचं प्रमाण लक्षात घेत जिल्ह्यात महापूर, दरड कोसळणे, यासारख्या नैसर्गिक आपत्तीचा जलद गतीनं सामना करता यावा यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल महाडमध्ये दाखल झालं आहे.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यात आजही पावसाचा जोर असल्यानं तळेरे-गगनबावडा-कोल्हापूर राष्ट्रीय महामार्गावर करूळ घाटात आज दुपारी दरड कोसळून वाहतुक काही काळ खंडित झाली. कुडाळ तालुक्यात आकेरी गावातल्या शेतकऱ्याचा ओहोळात वाहून गेल्यानं मृत्यू झाला.

मुसळधार पावसामुळे **रत्नागिरी** जिल्ह्यातल्या सर्वच नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होत असून, आज खेड तालुक्यातल्या जगबुडी नदीनं भरणे पूल या ठिकाणी इशारा पातळी ओलांडली. पावसामुळे रत्नागिरी-कोल्हापूर महामार्गावर आंबा घाटात आज तर निवळी घाटात काल दरड कोसळली. गुहागर तालुक्यात अति पावसामुळे झाडं पडून घर आणि मालमत्तेचं नुकसान झालं.

**गोंदिया** जिल्ह्यात कोसळत असलेल्या पावसामुळे सडक अर्जुनी तालुक्यातल्या चुलबंद नदी पात्रात अचानक आलेल्या प्रवाहामुळे रेती वाहून नेणाऱ्या बैलगाड्या अडकून पडल्या. उन्हाळ्यात नदी पात्रातुन पाणी काढण्यासाठी लावलेले पम्प देखील या प्रवाहात वाहून गेले. गोरेगाव तालुक्यातल्या बबई-कमरगाव या मार्गावरच्या पुलावरून पाणी वाहत असल्यानं या गावांचा संपर्क तुटला आहे.

**नाशिक** जिल्ह्यात मालेगाव इथं पावसामुळे एका घराचा स्लॅब कोसळून आजीसह नातवाचा मृत्यू झाला.

**नवी मुंबई** महानगरपालिका क्षेत्रात सुरू असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनं आज दुपारच्या सत्रातील सर्व **व्यवस्थापनाचा**

सर्व शाळांना सुट्टी जाहीर केली. नवी मुंबईत पावसामुळे काही ठिकाणी झाडं उन्मळून पडली.

**<><><><><>**

कोकण आणि लगतच्या घाट परिसरात येत्या ४ दिवसात वादळीवाऱ्यासह, मुसळधार पाऊस होईल, असा इशारा हवामान विभागानं दिला आहे. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड याशिवाय सातारा, पुणे आणि नाशिकच्या घाट परिसरात हवामान विभागानं उद्यासाठी रेड अलर्ट दिला आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटकाच्या किनारी भागात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळं हा पाऊस येण्याची शक्यता आहे. या पावसामुळं उद्या सकाळी साडे ११ वाजेपर्यंत कोकण किनारपट्टी तसंच मध्य महाराष्ट्रातल्या काही जिल्ह्यांमध्ये अचानक पूर येण्याचा इशाराही हवामान विभागानं दिला आहे.

**<><><><><>**

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत आज सकाळी कॅनडामध्ये व्हॅन्कुअर इथे झालेल्या 'राऊंड ऑफ 32' च्या सामन्यात स्वित्झर्लंडनं अल्जीरियाचा २-0 असा पराभव करून 'राऊंड ऑफ 16' मध्ये धडक मारली. टोरांटो मध्ये झालेल्या सामन्यात पोर्तुगालनं क्रोएशियाचा २-१ असा पराभव केला.

आज रात्री अमेरिकेत अरलिंग्टन इथे ऑस्ट्रेलियाची गाठ इजिप्तशी, मायामी इथे अर्जेंटिनाची गाठ काबो व्हर्डेशी तर कन्सास इथे कोलंबियाची गाठ घानाशी पडणार आहे.

**<><><><><>**

देशानं वर्षभरात १ ट्रिलियन डॉलरचं निर्यात उद्दिष्ट ठेवलं असून यंदाच्या पहिल्या तिमाहीत त्यापैकी १५ टक्के निर्यात झाली आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी आज नवी दिल्लीत व्यापार मंडळाच्या बैठकीत ही माहिती दिली. त्यादृष्टीनं निर्यातीत वाढ करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

निर्यातीला प्रोत्साहन देण्याच्या निर्णयाचा लाभ सूक्ष्म , लघु  आणि मध्यम उद्योगांना होईल, याची सरकार काळजी घेईल, असं ते म्हणाले.

<><><><><>

राम मंदिराच्या देणग्यांमधल्या अफरातफरी प्रकरणाचा निषेध म्हणून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष येत्या ५ जुलैपासून आंदोलन करणार असल्याची घोषणा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज केली. मुंबईत वांद्रे इथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या आंदोलनाचं नाव राम रक्षा आंदोलन असं असून ज्यांनी राम मंदिरात चोरी केली आहे, त्याच्या निषेधार्थ हे आंदोलन असून या राज्यव्यापी रामरक्षा आंदोलनाची सुरुवात मुंबईतून होत असल्याचं उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.

<><><><><>

जागतिक बाजारातल्या कच्च्या तेलाच्या दरात आज घसरण झाली आणि त्यानं ७१ अमेरिकन डॉलर प्रति बॅरेलचा टप्पा  गाठला.

//<><><><><>//